महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, जानेवारी १७, २००२/पौष २७, शके १९२३**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यामध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२, दिनांक १७ जानेवारी, २००२

## अधिसूचना

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि १९९०/४२४६/(४७)/पदुम-१४- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५४) च्या कलम क्रमांक २५ च्या पोट-नियम (१) आणि (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन नियम, १९८२ यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे. उक्त कलम २५, पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, ते पूर्वी प्रसिध्द करण्यात आले होते :-

**महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण जानेवारी १७, २००२/पौष २७, शके १९२३ (भाग चार-ब**

**नियम**

१. या नियमांस महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) निमय, २००१ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन नियम, १९८२ (यापुढे याचा उल्लेख मुख्य नियम असा करण्यात येईल). मधील नियम ४-पोट-नियम (१) खालीलप्रमाणे बदलण्यात यावा :-

(१) पोट-नियम (१) मधील “ फी” या रकान्याखाली खालीलप्रमाणे बदल करण्यात यावाः-

(अ) (एक) मध्ये नमूद केलेल्या “ शंभर रुपये ” हया शब्दाऐवजी “ पाचशे रुपये ”असा शब्द बदलण्यात यावा.

(ब) (दोन) मध्ये नमूद केलेल्या “ पन्नास रुपये ” हया शब्दाऐवजी “ दोनशे रुपये ” असा शब्द बदलण्यात यावा.

(क) (तीन) मध्ये नमूद केलेल्या “ वीस रुपये ” हया शब्दाऐवजी “ शंभर रुपये ” असा शब्द बदलण्यात यावा.

(ड) (चार) मध्ये नमूद केलेल्या “ दहा रुपये” हया शब्दाऐवजी “ पन्नास रुपये ” असा शब्द बदलण्यात यावा.

(२) पोट-नियम (३) नंतर खालीलप्रमाणे नवीन पोट-नियमाचा समावेश करण्यात यावा :-

(४) नियमातील कलम-६ खाली परवान्याची प्रतिलिपी देताना रुपये दोनशे इतके शुल्क आकारण्यात यावे.

३. मुख्य नियमामधील कलम-९ मध्ये नमूद केलेल्या “पाच रुपय” या शब्दाऐवजी “दोनशे रुपये” असा शब्द बदलण्यात यावा.

४. मुख्य नियमामधील नियम ११ नंतर खालील नियमाचा समावेश करण्यात यावा :-

“ ११ (अ) नोंदणी प्रमाणपत्र ठरवून दिलेल्या बंदराव्यतिरिक्त दुसऱ्या बदंरात मच्छिमार नौका घेऊन जावयाची असल्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत कलम १० तील पोट-कलम (३) नुसार देण्यात आलेल्या नोंदणी प्रमाणपत्रात ठरवून दिलेल्या बंदराव्यतिरिक्त दुसऱ्या बंदरात मच्छिमार नौका घेऊन जायची परवानगी मिळण्याबाबतच्या आर्जासोबत तीनशे रुपये इतके शुल्क आकारण्यात यावे.”

५. मुख्य नियमामधील नियम क्रमांक १४ नंतर खालील नियमांचा समावेश करण्यात यावा :-

“१५ कलम १८(३) खाली अपील दाखल करताना आकारावयाच्या फीबाबत-कलम ८(३) खाली अपील दाखल करताना एक हजार रुपये इतकी फी आकारण्यात यावी.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्या. ना. धकाते,
शासनाचे उपसचिव,